# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २०/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)**

आपत्ती प्राधान्य

**वाचा:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १३/०३/२०२०.
४) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.
५) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक १९/०३/२०२०.

## सुधारीत आदेश

ज्या अर्थी, सध्या महाराष्ट्रात नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे व इतर प्रवास माध्यमाद्वारे प्रवासी भारतात विविध भागांत प्रवास करीत आहे. असे प्रवासी परदेश प्रवास करुन महाराष्ट्रातील विविध भागात आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोन विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे करोना विषाणूंचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणेआवश्यक आहे.

त्याअर्थी मी, रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील कलम १४२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार आदेशीत करण्यात येत आहे की, **जालना जिल्हयातील सर्व ठोक व किरकोळ देशी आणि विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्तीचे व्यवहार आज दिनांक २० मार्च २०२० रात्री १०:०० वा. पासून ते दिनांक ३१ मार्च २०२० अखेर पूर्ण दिवस बंद राहतील.**

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित अनुज्ञप्ती धारकाविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

Raut

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जालना**
20/3/2020

प्रति,
सर्व संबंधित अनुज्ञप्तीधारक,
(मार्फतः- निरीक्षक/दु.निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जालना)

प्रत माहितीस्तव

१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई
४) मा.विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग यांना माहितीस्तव.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना
६) पोलीस अधिक्षक, जालना
७) जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांना प्रसिध्दीस्तव.